**महसूल व वन विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांकडून ई-ऑफिस प्रणाली अंमलबजावणी करणे व टपाल ई- ऑफिस प्रणालीद्वारे स्विकारण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण २०२६/ प्र.क्र. २/नों.शा.**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ मार्च, २०२६

**वाचा -** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र. ०२/१८ (र. व का.), दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३.

# परिपत्रक

मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागासह क्षेत्रीय कार्यालयातील शासकीय कामकाजात ई-ऑफीस प्रणालीचा वापर करण्याच्या सूचना संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन शासन स्तरावरील कामकाज पुर्णत: ई-ऑफीस प्रणालीवरुन वापर सुरु झाले आहे. मात्र क्षेत्रीय यंत्रणांकडून अद्यापि हस्तबटवडा तसेच ई- मेल द्वारे टपाल पाठविण्यात येत आहे. त्यामुळे ई-ऑफीस प्रणालीच्या अनिवार्य उपयोगाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) महसूल व वन विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी आपआपसातील सर्व पत्रव्यवहार तसेच कार्यालयीन नस्त्यांचे / प्रस्तावांचे सादरीकरण हे ई-ऑफीसच्या माध्यमातून करावे. त्यास अनुसरुन शासनाकडे करावयाचा पत्रव्यवहार हा ई-ऑफीसच्या Receipts च्या माध्यमातूनच करण्यात यावा.

२) महसूल व वन विभाग, मंत्रालय येथे पाठवावयाचे टपाल ई-ऑफीस प्रणालीच्या Receipts द्वारे खालील संबंधित कर्मचा-यांच्या खात्यावर पाठविण्यात यावा :-

| अ क्र | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | ई ऑफीस आय.डी. | उप विभाग/ विषय |
|---|---|---|---|
| १ | Nitin Brijulal Mude | MRF-ADDIASO (NBM)-MRF(DESK REGISTRY) | वने व भूसंपादन उपविभाग संबधित टपाल |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | Shweta Ganesh Thite | MRF-ST (SGT)-DESK REGISTRY MRF (DESKREGISTRY) | न्यायालयीन संदर्भ /प्रकरणे |
| ३ | Shivaji Ramchandra Avhad | MRF-CLKTYP (SRA)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | मदत, पुनर्वसन, आपत्ती, अपील व रिविजन, जमीन व मंत्रालय नियंत्रण कक्ष संबंधित टपाल |
| ४ | Rahulsinha Sawant | MRF-CLKTYP (RSS)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | ई (आस्थापना) समुह संबंधित टपाल, माहितीचा अधिकार व लोक आयुक्त संदर्भ |
| ५ | Sneha Dnyaneshwar Rathod | MRF-CLKTYP (SDR)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री/ राज्यमंत्री, मुख्य सचिव यांच्या कार्यालयांकडून येणारे टपाल |
| ६ | Lav Ramkrishna Gavade | MANTRA-CRU-ASO (LRG)-MANTRA-CRU | मध्यवर्ती टपाल केंद्रात सर्वसामान्य जनतेकडून येणारे टपाल |

(३) वरील कर्मचारी यांची बदली झाल्यास नवीन येंणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती नोंदणी शाखा प्रमुखांकडून पत्राद्वारे संबंधित उप विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येईल.

(४) उपरोक्त उपाययोजनांच्या अनुषंगाने दि. ३० मार्च २०२६ नंतर कोणतेही हस्तबटवड्याचे टपाल शासनस्तरावर स्विकारण्यात येणार नाही, तसेच ई-मेलवरील संदर्भ शासकीय टपाल म्हणून गृहीत धरले जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी उचित नोंद घ्यावी.

(५) उपरोक्त उपाययोजनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांमध्ये ई-ऑफीस प्रणालीच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेल्या साधन सामुग्रीच्या (उदा. स्कॅनर, संगणक, डिजिटल सिग्नेचर करिता टोकन, इत्यादी) उपलब्धतेबाबतच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात.

(६) ई-ऑफीस प्रणाली वापराच्या अनुषंगाने अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास स्थानिक स्तरावरील महाआयटी/एनआयसी कार्यालयांकडून प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करण्यात यावे अथवा क्षेत्रिय कार्यालयांच्या स्तरावर उपलब्ध असलेल्या महाआयटी / एनआयसी कडून आयटी मदतनीसांची मदत घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२३१५२४१८१३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH HEMCHAND BAGDE
Date: 2026.03.23 15:28:46 +05'30'

**( राजेश हे. बागडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

- अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अप्पर मुख्य सचिव (वने व भुसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अप्पर मुख्य सचिव (अ व री ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रधान सचिव (मदत व पुर्नवसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- संचालक, (आपत्ती व्यवस्थापक) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, एपीजे हाऊस, मुंबई.
- राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
- संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
- सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
- आयुक्त, जमाबंदी कार्यालय, पुणे
- संचालक, भुमी अभिलेख पुणे.
- महानिरिक्षक मुद्रांक, पुणे
- सर्व जिल्हाधिकारी कार्यालये
- सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती (नोंदणी शाखा) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.